MHKO100001452026

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १२/२०२६ निशाणी क्र. १ वरील आदेश

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७ व ५०३ प्रमाणे गडहिंग्लज स्टेशन यांनी जप्त केलेली होंडा मोटरसायकल ॲण्ड स्कूटर कंपनीची युनिकॉर्न मोटसायकल क्रमांक एमएच–०९–जीएक्स–९३३१ हे वाहन परत मिळावे याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असून अर्जदार यांच्या दैंनदिन वापरातील आहे. सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचे वाहन बॉन्डवर परत मिळावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. तपासीक अंमलदार यांनी निशाणी ५ येथे आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, आरोपी हा आडदंड व हेकेखोर प्रवृत्तीचा असून त्यास जप्त मोटरसायकल ताब्यात दिलेस तो पुन्हा यातील फिर्यादीस त्रास देणेची शक्यता आहे. त्यामुळे सदर आरोपीस त्याची जप्त मोटरसायकल ताब्यात देण्यात येवू नये ही विनंती.सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, जप्त मोटारसायकलचा गुन्हयात वापर झाला आहे. ती परत केल्यास पुन्हा गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे. अर्जदारने गंभीर गुन्हा केला आहे. पुढील तपासाकरीता सदर मोटरसायकलची आवश्यकता आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अर्जदारतर्फे विधीज्ञ व सहा.सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

६. तपासीक अंमलदार यांच्या म्हणण्यावरुन स्पष्ट होते की, सदरचे वाहन गडहिंग्जल पोलिस स्टेशनचे गु.र.नं.७६४/२०२५ यांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८(१),१२६(२),३५१(२) तसेच बालकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२ प्रमाणे दाखल गुन्हयाचे तपासादरम्यान जप्त केले आहे. अर्जदार यांनी याकामी वाहनाचे आर. सी. बुकची साक्षांकित प्रत, विमा पॉलीसीची झेरॉक्स प्रत, आधार कार्डची साक्षांकित प्रत, गु.र.क्र.७६४/२०२५ मधील प्रथम वर्दी अहवालाची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या आर सी. बुकाची प्रत, विमा पॉलीसी चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे आहे.

७. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***Sundharbhai Ambalal Desai V/s. State of Gujarat (Supra) reported in 2003 All MR (Cri.) 363 (SC)*** या न्यायनिवाडयात मुद्देमाल परतीबाबत आदेश करताना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना मार्गदर्शन सुचना घालून दिलेल्या आहेत. या मार्गदर्शन सुचनाप्रमाणे कोणताही मुद्देमाल १५ दिवस ते १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता पोलिस स्टेशनमध्ये पडून राहता कामा नये त्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी योग्य ते आदेश केले पाहिजेत असे निर्देश दिले आहेत.

८. सरकारी वकील यांनी जरी सदरचे वाहन परत करण्यास हरकत घेतली असली तरी सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये जास्त दिवस पडून राहीलेस ऊन, वारा व पाऊस यामुळे या वाहनाचे नुकसान होवू शकते. तपासीक अंमलदार यांनी अर्जदार यांच्या मालकीबाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत काही अटीवर अर्जदार यांना हे वाहन परत देणे न्यायोचीत होणार आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## // आ दे श //

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) गु.र.नं. ७६४/२०२५ यामध्ये गडहिंग्लज पोलिस स्टेशन यांनी जप्त केलेली होंडा मोटरसायकल ॲण्ड स्कूटर कंपनीची युनिकॉर्न मोटसायकल क्रमांक एमएच–०९–जीएक्स–९३३१ ही अर्जदार यांनी रक्कम रुपये १,००,०००/– (अक्षरी रुपये एक लाख मात्र) चा सुपूर्दगीनामा संबंधीत पोलिस स्टेशनकडे करुन देणेच्या अटीवर व खालील अटीवर परत देण्यात यावी.

अ) अर्जदार यांनी सदर वाहनाचा रंग अथवा बाह्य स्वरुपात या गुन्हयाचा निकाल होईपावेतो कोणताही बदल करणेचा नाही.

ब) अर्जदार यांनी आवश्यकता असेल तेव्हा सदरचे वाहन न्यायालयात अथवा संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करावे.

क) अर्जदार यांनी सदर गुन्ह्याचा निकालापावेतो हे वाहन कोणत्याही प्रकारे कोणासही तबदील करणेचे नाही.

ड) अर्जदार यांनी या वाहनाचे दोन रंगीत फोटो विविध कोनातून जवळून घेतलेले दाखल करावेत.

इ) अर्जदार यांनी सदरच्या वाहनाचा वापर या गुन्ह्याचा निकालापावेतो इतर कोणत्याही गुन्ह्यात करणेचा नाही.

३) तपासीक अंमलदार यांनी सदर वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देताना त्याचा रितसर पंचनामा करुन सदरचे वाहन सत्वर अर्जदार यांचे ताबेत द्यावे व तसा

अहवाल या न्यायालयास सादर करावा याबाबतचे सुचनापत्र तपासीक अंमलदार यांना पाठविण्यात यावे.

४) या आदेशाची छायांकित प्रत गडहिंग्लज पोलिस स्टेशन यांचे गु.र.नं. ७६४/२०२५ मध्ये ठेवणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.13 11:17:07 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १२/०३/२०२६

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट क्र.२)
गडहिंग्लज